# वाणिज्य-विभागअहवाल 2022-2023. 31/05/2023

शैक्षणिकवर्ष 2022 23 मधीलवाणिज्यविभागाचाअहवालखालीलप्रमाणेदेतआहोत.

या शैक्षणिकव र्षामध्ये महाविद्यालयांमध्ये एकूण एफ.वाय.बी.कॉम ८६ विद्यार्थी एस.वाय.बी.कॉम ९० विद्यार्थी टी.वाय.बी.कॉम ९३विद्यार्थी प्रवेशित होते.

वाणिज्य विभागामार्फत या शैक्षणिक वर्षांमध्ये पुढील उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आलेले आहेत. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत.

1] महाविद्यालयातील नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रेरणा मिळावी म्हणून इंडक्शन प्रोग्राम सत्यम इन्स्टिट्यूटचे श्री संदीप मालुसरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यामध्ये प्रामुख्याने एफ.वाय.बी.कॉम मधील ८०विद्यार्थी व एस.वाय.बी.कॉम मधील ७० विद्यार्थ्यांनी विशेष स्तरावर कॉस्टिंग हा विषयघेतलाअसेएकूण १५०विद्यार्थी सहभागी झाले होते.#

2 ] दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ ते ७ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये मिळावे म्हणून मोरडे फूड प्रॉडक्ट कंपनीचे व्यवस्थापक मा. श्री. मदन देशपांडे सर सनदी लेखापाल यांच्या मार्गदर्शनाखाली SAP (System Application Program) या कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. या कोर्स साठी महाविद्यालयामार्फत १० युझर चे सॉफ्टवेअर खरेदी करून विद्यार्थ्यांना सरावासाठी वाणिज्य संगणक कक्षात उपलब्ध करून देण्यात आले. या कोर्सचा फायदा तृतीय वर्ष वाणिज्य मधील ५० विद्यार्थ्यांनी घेतला. संस्थेचे व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ह्या कोर्सच्या आयोजनासाठी विभागप्रमुख प्रा.डॉ. मोकळं सर यांचे मार्गदर्शन लाभले. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्रा. कदम एस. सी. म्हणून काम पहिले

3] महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी काही तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केले होते त्यामध्ये प्रामुख्याने श्री.उत्कर्ष काळे सर टॅक्स कन्सल्टंट दिनांक 24 मार्च, निलेश फुलवडे सर टॅक्स कन्सल्टंट दिनांक 18 मार्च,प्राध्यापक ताजने सर,टॅक्सकन्सल्टंट 13 मार्च. या सर्व तज्ञ व्यक्तींची व्याख्याने महाविद्यालयात झाली यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञानाची माहिती झाली.

4] महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी सक्सेसस्टोरी अंतर्गत महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते 19 एप्रिल ते 30 एप्रिल पर्यंत श्री.पवन खंडागळे श्री.दिनेश सहाने प्रकाश आव्हाड आदी विद्यार्थ्यांचा मार्गदर्शनाचा मुलांना चांगल्या प्रमाणात लाभ झाला.

5] महाविद्यालयामध्ये ५ मार्च ते ५ एप्रिल २०२३ दरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले यामध्ये संगणकीय ज्ञान व स्पोकन इंग्लिश आधी कोर्सचे आयोजन करण्यात आले होते प्राध्यापक खरात सर व प्राध्यापक कदम सर यांनी यासाठी विशेष मार्गदर्शन केलेले आहे.

6] महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावसायिक ज्ञान उपलब्ध व्हावे म्हणून वडगाव कांदळी येथील व्यावसायिक संस्थेला शैक्षणिक सहल आयोजित करून भेट देण्यात आली सहकार तत्वावरील ही महाराष्ट्रामध्ये प्रथम एम.आय.डी.सी.असून किंवा औद्योगिक महामंडळ असून यामध्ये 20 ते 22 लहान उद्योगांना विद्यार्थ्यामार्फत भेट देऊन माहिती मिळवण्यात आली सदर सहल 19 एप्रिल 2023 रोजी आयोजित करण्यात आली होती.

7] शैक्षणिक कार्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध प्रकारचे महोत्सव आयोजित करण्यात आले होते या मध्ये प्रामुख्याने ट्रॅडिशनल डे मिस मॅच डे व साडी डे इत्यादीचे  आयोजन दिनांक 17 एप्रिलव 19 एप्रिल 2023 दरम्यान आयोजित करण्यात आले होते.

8] याशैक्षणिक वर्षामध्ये 13 एप्रिल 2023 रोजी एफ.वाय./एस.वाय/.टी.वाय.बी.कॉम यावर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालक मेळावा आयोजित केला होता या मध्ये सर्वसाधारणपणे 75 महिला पालक व 65 पुरुष पालक सहभागी झाले होते यामध्ये श्री.पातकर धनंजय व दीपक लोढा यांनी पालकांच्या अपेक्षेविषयी मते व्यक्त केली.

9] ५ मार्च २०२३ रोजी  यंग लीडर इंटरशिप संस्थामार्फत वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना नोकरीच्या सुवर्णसंधी अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या विभागातील माझे सहकारी प्राध्यापिका शितल बोऱ्हाडे मॅडम, रेश्मा शिंदे मॅडम, रेखा कडाळे मॅडम, प्राध्यापक सूर्यकांत कदम यांनी मोलाचे सहकार्य केलेले आहे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. वाल्हेकर सर यांचेही वेळोवेळी मार्गदर्शनव सहकार्य लाभलेले आहे या सर्वांचा मी विभागप्रमुख म्हणून आभारी आहे.

प्रा.डॉ.प्रभाकर रामजी मोकळ
वाणिज्य विभागप्रमुख.
बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव